अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड । गुरुवार
२४.०९.२०२६
वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्षः ०७ | अंकः २३६ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## मैत्रिणी ओरडल्या, बाजुला करण्यासाठी धावल्या पण...

# क्षणार्धात अंगावर रक्त पडलं अन अनुष्काचा मृतदेह 30 फूट हवेत उडाला

**कानातले इयरफोन ठरले जीवघेणे**



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**कोल्हापूर** – कोल्हापुरातील हातकणंगलेत रेल्वे ट्रॅकवर फोनवर बोलत चाललेल्या १७ वर्षीय तरुणीचा धनबाद एक्स्प्रेसच्या धडकेत दुर्दैवी मृत्यू झाला आहे. अनुष्का संतोष पोवार, रा.इचलकरंजी, असे मृत तरुणीचे नाव आहे.

काल (ता.२३) बुधवारी सकाळी साडेबारा वाजण्याच्या सुमारास हातकणंगले येथील रेल्वे स्थानकाजवळ ही घटना घडली. अनुष्का आपल्या दोन मैत्रिणींसोबत रेल्वे रुळावरून चालत होती. त्यावेळी तिच्या कानात इयरफोन होते. मागून येणाऱ्या धनबाद एक्स्प्रेसचा अंदाज न आल्याने ती धडकेत गंभीर जखमी झाली. तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. उपचारासाठी तिला हातकणंगले ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन प्राथमिक तपास सुरू केला असून, पुढील तपास हातकणंगले पोलीस करत आहेत. अनुष्काचा मृतदेह ३० फूट हवेत उडाला इअरबड्स घालून रेल्वे रुळावरून चालत जात असलेल्या अनुष्का संतोष पोवार हिला धनबाद एक्स्प्रेसने धडक दिल्याने ती जागीच ठार झाली. अनुष्काचा मृतदेह ३० फूट हवेत उडाला. रक्ताचा सडा अंगावर उडाल्याने मैत्रिणी बेशुद्ध पडल्या. त्या शुद्धीवर आल्यावर अपघाताचे गूढ उकलले. हातकणंगले ग्रामीण रुग्णालयासमोर बुधवारी सकाळी ११ वाजता ही घटना घडली.

अनुष्का पुढे होती, तर तिच्या दोन मैत्रिणी वीस-तीस फूट अंतर मागे होत्या. रेल्वे येत असताना मैत्रिणी बाजूने ओरडत धावत अनुष्कापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत होत्या. अनुष्काला रेल्वेची धडक बसली आणि मैत्रिणींच्या डोळ्यादेखत तिचा मृत्यू झाला.

# कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनाही लाभ देणार

* कोरड्या दुष्काळाचा जीआर काढणार
* पीकविम्याचे प्रश्नही सोडविण्याचे आश्वासन

## मुख्यमंत्री फडणवीस यांची वाशिममध्ये घोषणा



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वाशिम** – दुष्काळाने शेतीचे कंबरडे मोडले असताना कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी वाशिममध्ये केली. २०१६-१७ मधील कर्जमाफीचा लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांना आता कर्जमाफी दिली जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर कोरड्या दुष्काळाचा शासन निर्णय लवकरच काढण्यात येणार असून पीकविम्याशी संबंधित प्रश्नही मार्गी लावण्याची ग्वाही त्यांनी दिली.

दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी फडणवीस बुधवारी लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांच्या दौऱ्यावर होते. त्यानंतर गुरुवारी त्यांनी वाशिम जिल्ह्यातील मसाल गावात शेतकऱ्यांशी संवाद साधला. पिकांचे नुकसान, पाण्याची टंचाई आणि जनावरांच्या चाऱ्याची समस्या याबाबत शेतकऱ्यांनी त्यांच्यासमोर व्यथा मांडल्या. फडणवीस यांनी शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेत त्यांना सरकार त्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वास दिला.

तुम्ही काळजी करू नका. सरकार तुमच्या पाठीशी आहे. आम्ही तुम्हा सर्वांना मदत करणार आहोत. तुमचे प्रश्न सोडवणार आहोत, असे फडणवीस यांनी शेतकऱ्यांना सांगितले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर कोरड्या दुष्काळाचा जीआर काढण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच पीकविम्याच्या प्रश्नांवरही मार्ग काढण्यात येईल, असे आश्वासन दिले.

२०१६-१७ मधील कर्जमाफीच्या वेळी ज्या शेतकऱ्यांना लाभ मिळाला नाही, त्या सर्वांना कर्जमाफी देण्याची घोषणा फडणवीस यांनी केली. वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनाही मदत करणार आहोत. तुम्ही काळजी करू नका, असे त्यांनी सांगितले. राज्यात

**काळजी करू नका, सरकार तुमच्या पाठीशी !**

“मुख्यमंत्र्यांनी फडणवीस यांचा ताफा मसाल गावातून जात असताना शेतकऱ्यांनी हात उंचावून त्यांचे लक्ष वेधले. मुख्यमंत्री यांनी ताफा थांबवून पुन्हा शेतकऱ्यांशी संवाद साधला. ‘मी तुम्हा सर्वांना मदत करणार आहे. तुमचे प्रश्न सोडवणार आहे. तुम्ही काळजी करू नका,’ असे त्यांनी सांगितले. या वेळी शेतकऱ्यांनी फडणवीस यांच्या समर्थनार्थ घोषणा दिल्या.

## थोडक्यात

### राष्ट्रपती मुर्मू यांचं आवाहन : आता मुंढेंनीही दिला सेलिब्रेटींना इशारा


(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – लोकप्रिय कलाकारांमध्ये देशवासीयांवर, विशेषतः तरुणाईवर प्रभाव टाकण्याची मोठी क्षमता असते.

अंधार पसरवणारा कधीही स्टार होऊ शकत नाही, अशी भूमिका राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मांडली आहे. गुजरातमधील एकतानगर येथे झालेल्या ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी प्रसिद्ध कलाकारांना आरोग्यासाठी हानिकारक उत्पादनांचे समर्थन न करण्याचे आवाहन केले, ज्याचे समर्थन करत महाराष्ट्राच्या एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सेलिब्रिटींना सज्जड इशारा दिला आहे.

# कंपनीतील भिंत कोसळून 3 कामगारांचा मृत्यू

## पोलीस घटनास्थळी दाखल, कामगार सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पालघर** – एमआयडीसी असो किंवा इंडस्ट्रीज इस्टेट, येथील कंपन्यांमध्ये काम करत असताना कामगारांची सुरक्षा अतिशय महत्त्वाची असते. कामगारांच्या सुरक्षेचे नियम पाळणे कंपनीला बंधनकारक असते.

मात्र, तरीही कधी कधी अपघाताच्या घटना घडतात. पालघर जिल्ह्याच्या वाडा तालुक्यातील पाली पोशेरी येथील कंपनीत दुर्घटना. कंपनीतील भिंत कोसळून तीन कामगारांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली. या घटनेनं कंपनी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, बार्शी तालुक्यातील वैराग येथे देखील दोन दिवसांपूर्वी घराची भींत कोसळून २ महिलांचा मृत्यू झाला होता.

पालघर जिल्ह्याच्या वाडा येथील पोशेरीत टीना रबर कारखान्यात अपघाताची दुर्घटना घडली असून मृतांमध्ये दोन महिला तर एका पुरुषाचा समावेश आहे. केशव गुणगुणा, रंजना कोंब आणि मीरा गवळी अशी मृत व्यक्तींची नावे आहेत. या घटनेनंतर वाडा पोलीस घटनास्थळी दाखल झाल असून संबंधित घटनेचा तपास करत आहेत. मात्र, या दुर्घटनेमुळे, पालघर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रांमधील कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. बार्शीत भींत कोसळून दोन महिला ठार बार्शी तालुक्यातील वैरागमध्येही दोन दिवसांपूर्वीच अशीच एक दुर्दैवी घटना घडली होती.

कमकुवत झालेल्या घराची भिंत अचानक कोसळून मावशी-भाचीचा मृत्यू झाला आहे. वैरागमधील खेंदाड गल्लीमध्ये पहाटे साडेपाचच्या सुमारास ही घटना घडली.

# स्लीपर एसी बसला लागलेल्या भीषण आगीत ९ जिवंत जळाले

**मृतांची ओळख पटवणं सुद्धा अवघड : २० जणांचा जीव वाचवला**

**जळालेल्या बसवर आतापर्यंत १९ चालान, पावणे दोन लाखांचा दंड**




(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नोएडा** – उत्तर प्रदेशातील नोएडा येथे यमुना एक्सप्रेसवेवर एका स्लीपर एसी बसला आग लागली. या अपघातात नऊ प्रवासी जिवंत जळाले. यामध्ये आठ पुरुष आणि एका महिलेचा समावेश होता. बसमध्ये ३५ प्रवासी होते.

अनेक प्रवाशांनी खिडक्या फोडून आणि बाहेर उडी मारून स्वतःचा जीव वाचवला, तर इतर २० जणांना वाचवण्यात आले. मृतदेह खूप जळाले होते आणि त्यांची ओळख पटवणे कठीण आहे. हा अपघात बुधवारी रात्री साडे अकराच्या सुमारास जेवर विमानतळापासून ५०० मीटर अंतरावर घडला. ही बस दिल्लीच्या काश्मिरी गेटवरून महोबासाठी निघाली होती.

सीएफओ प्रदीप कुमार यांनी सांगितले की, प्राथमिक तपासानुसार एसी इंजिनमधील ठिणगी किंवा स्फोटामुळे आग लागली. बस पूर्णपणे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली अग्निशमन दलाची पाच वाहने घटनास्थळी दाखल झाली आणि त्यांनी ४५ मिनिटांत आग विझवली. अग्निशमन दलाच्या जवानांनी बसमध्ये प्रवेश करण्यासाठी स्लीपर बसचा मागील भाग कापला आणि एकेक करून मृतदेह बाहेर काढले. बचावकार्य सुमारे दोन तास चालले.

ही बस मध्य प्रदेशातील राज कल्पना ट्रॅव्हल्सची आहे. यासाठी १९ चालान आकारण्यात आले आहेत. १.७५ लाख रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. पोलिसांनी चालक पवन आणि वाहक योगेश यांना अटक केली आहे.

# पैशांसाठी ७२ वर्षीय मालकीणीचा खून, सालगड्याला पोलिसांनी घेतले ताब्यात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जळगाव** – पैशांची गरज भागविण्यासाठी ७२ वर्षीय मालकीणीचा खून केल्याची धक्कादायक घटना रावेर तालुक्यातील दोधा गावात समोर आली आहे. शेतमालक कुटुंबाकडे सालगडी म्हणून काम करणाऱ्या १९ वर्षीय तरुणावर या हत्येचा संशय असून, रावेर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. ललिताबाई वसंत पाटील (वय ७२) असे मृत



महिलेचे नाव आहे, तर लाला धर्मा भिलाला (वय १९) असे ताब्यात घेतलेल्या संशयिताचे नाव आहे.

घरात एकट्या असल्याची संधी साधली पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, लाला भिलाला हा दोधा येथील पाटील कुटुंबाकडे सालदार म्हणून काम करत होता. काही दिवसांपूर्वी त्याची पत्नी माहेरी गेली होती. तिने पतीकडे ३० हजार रुपयांची मागणी केल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. पैशांची गरज असल्याने ललिताबाई यांच्या अंगावरील दागिने लुटण्याचा विचार त्याच्या मनात आला असावा, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.




पी.एम.श्री जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक कन्या शाळा पुसला येथे

# वर्ग पाचवीची पालक सभा व बक्षिस वितरण



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – पी.एम.श्री जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक कन्या शाळा पुसला येथे वर्ग पाचवीची पालक सभा व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी सरपंच सुशीला श्रीराव होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणुन जिजामाता हायस्कूलच्या मुख्याध्यापिका विजया काळे, मुख्याध्यापक भगवंत गजभिये, विनोद खासबागे, नरेंद्र येवले, मिलिंद येवले, विजय कोल्हे, मोहिनी कोल्हे, रिना रमेश शिरभाते, नलिनी दीपक धार्मिक उपस्थित होते.

ऑनलाईन चित्रकला स्पर्धेमध्ये आराध्या प्रवीण डोंगरे, गुंजन दिलीप गजबे, रुचिका राजू मंगरघाये, पूजा प्रकाश ढोमणे, मनस्वी निलेश लोखंडे, आरती अनिल बांगडे, ज्ञानेश्वरी सुनील सावरकर, रिद्धी गुणवंत वाघ, कृत्तिका देव्हारे हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

त्यानंतर ऑनलाईन चित्रकला स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक हार्दिक विजय कोल्हे मोवाड, तृतीय क्रमांक भूमी राहुल डोंगरे, गौरी मिलिंद येवले, देवांशी रमेश शिरभाते, कृतिका गणेश कोकोडे, श्रावणी विनोद खासबागे यांना ट्रॉफी प्रमाणपत्र व सहभागी विद्यार्थ्यांना मेडल आणि प्रमाणपत्र आराध्या प्रवीण डोंगरे, वैष्णवी उमेश हेडाऊ, विधी नरेंद्र येवले, रुचिका राजू मंगरघाये, गुंजन घनशाम वडस्कर, सोनाक्षी विनोद कुहीटे, रागिनी निलेश नांदणे, गुंजन दिलीप गजबे, पूजा प्रकाश ढोमणे, हर्षिका संजय माहोरे, तेजश्री गणेश कोकोडे, निशा मंगेश उईके, तेजस मनोज धकीते, भाविका विनोद खासबागे, दिव्या दीपक धार्मिक, चित्रकला स्पर्धा राबविल्यामुळे मीना सोनकुसळे यांना सुद्धा ट्रॉफी सुशिला श्रीराव व मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.

जया बारमास यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. सर्व शिक्षक आणि शिक्षिका यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. सर्व पालकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले व कार्यक्रमाची शोभा वाढवली. शाळा व्यवस्थापन समितीच्या सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन अरुणा देविदास कोहळे तर आभार मीना सोनकुसळे यांनी मानले.

# सरकारी शाळा बंदच्या धोरणाविरोधात धरणे : आझाद मैदानावर ५ ऑक्टोबरपासून आंदोलन

## सिंधुदुर्गातून ३००० जण सहभागी होणार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**कुडाळ** – शासनाच्या धोरणांमुळे सरकारी आणि अनुदानित शाळा बंद पडत असल्याचा आरोप करत 'शाळा वाचवा, शिक्षण वाचवा' या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानावर ५ ऑक्टोबरपासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

'शाळा वाचवा, शिक्षण वाचवा मंच, महाराष्ट्र'च्या वतीने हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती 'शिक्षक भारती'चे नेते संजय वेतुरेकर यांनी दिली. या आंदोलनात सिंधुदुर्ग जिल्ह्यातून सुमारे तीन हजार नागरिक सहभागी होणार असल्याचे वेतुरेकर यांनी सांगितले. जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या



स्वयंसेवी संस्था, शिक्षणप्रेमी, शिक्षण संस्थाचालक, सरपंच, शिक्षक आणि पालकांची संयुक्त बैठक कुडाळ येथील मराठा समाज हॉलमध्ये झाली. बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना वेतुरेकर यांनी आंदोलनाची माहिती दिली. यावेळी ॲड.कमलाकांत कुबल, शिक्षक नेते राजन कोरगावकर, अंकुश कदम, प्रशांत आडळकर, युगांत चव्हाण यांच्यासह सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्ते उपस्थित होते.

हे आंदोलन शिक्षण क्षेत्रातील वाढत्या खासगीकरणा विरोधातील लढा असल्याचे सांगत मंचाच्या वतीने सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी आंदोलनाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

डॉ.चौधरी हॉस्पिटलचा स्तुत्य उपक्रम

# गणेशोत्सवाच्या मंगल पर्वात बाल आरोग्याचा जागर

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तसेच सार्वजनिक गणेश मंडळ यांच्या समन्वयाने 'श्रीगणेशा आरोग्याचा आरोग्य अभियान २०२६' राबविण्यात येत आहे. १४ ते २५ सप्टेंबर या कालावधीत विविध आरोग्यविषयक उपक्रम व आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या अभियानाचा एक भाग म्हणुन डॉ.चौधरी





हॉस्पिटल यांच्या वतीने २२ सप्टेंबर रोजी शनिवार पेठ येथील आदर्श गणेश मंडळात लहान मुलांसाठी मोफत बालरोग तपासणी शिबिर व मोफत औषधी वाटप करण्यात आले. या शिबिरामध्ये बालरोग तज्ञ डॉ.प्रवीण चौधरी तसेच आर.एम.ओ.डॉ.आस्था थोटे यांनी बालकांची तपासणी करुन त्यांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेतल्या. आवश्यक त्या बालरोगविषयक मार्गदर्शनासह बालकांना मोफत औषधोपचार व औषधांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश लहान मुलांच्या आरोग्याबाबत जनजागृती करणे, बालकांच्या आजारांचे वेळेत निदान व उपचार करणे तसेच गरजू कुटुंबांना आरोग्यसेवा उपलब्ध करुन देणे हा आहे. मोफत आरोग्य शिबिराच्या यशस्वीतेसाठी आदर्श गणेश मंडळाचे अभिषेक लोखंडे, सुरज देशमुख, मंगेश माकोडे, योगेश शेरेकर, भूषण कडू, हर्षद उघडे, विक्की बिजवे, अनुप चोबीतकर, पंकज चोबीतकर, गोकुल विंचूरकर, जीवन पाटील, जवाहर विद्या मंदिरच्या मुख्याध्यापिका मिरा राठोड, दवंडे व डॉ चौधरी हॉस्पिटलचे कर्मचारी निलेश घोरमाडे, अब्दुल नजीर, संस्कृती ठाकरे, आरोग्यमित्र दिनेश घ्यार आदींनी परिश्रम घेतले.

श्रीगणेशा आरोग्याचा आरोग्य अभियान २०२६ अंतर्गत आयोजित या मोफत आरोग्य शिबिरास नागरिक व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# पिपलागडच्या जि.प.प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय वस्तूचे वाटप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – पुसला येथील युवा मित्र मंडळाचे अध्यक्ष सुरज धर्मे यांच्या मातोश्री स्व.नंदा अशोकराव धर्मे यांच्या तिसऱ्या पुण्यस्मरणा निमित्य जि.प.प्राथमिक शाळा पिपलागड येथील विद्यार्थ्यांना शालेय वस्तू व शाळेकरीता खेळाचे साहित्य देण्यात आले.

कार्यक्रमा करिता ठाणेदार राहुल गवई, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष(अप) तालुकाध्यक्ष विजय वडस्कर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बबन धुर्वे, जि.प.प्राथमिक शाळा मुख्याध्यापक ताराचंद कोरडे, सहाय्यक शिक्षिका सोनू उईके, गजानन जुननकर, उमेश कोल्हे, स्वराज्य फॉउंडेशन पुसला अध्यक्ष राजू वरुडकर, सुधाकर धुर्वे, राहुल उइके, दिवाकर धुर्वे, लिकेश खंते, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, विद्यार्थी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमा करिता युवा मित्र मंडळ अध्यक्ष सुरज धर्मे, सचिव प्रद्युम्न तवले, सहसचिव धिरज सावरकर, प्रमोद पाटील, अमर इवनाते, कमलेश खपरीये, योगेश राऊत, कृणाल क्षीरसागर, देवांशू नारनवरे, रोहन बागडे, समर मोरे आदींनी परिश्रम घेतले.



# उद्घाटनापूर्वीच श्रेयाची 'लढाई' : जिजाऊ प्रवेशद्वारावर पालकमंत्र्यांचे नाव

## मराठा समाजासह विविध संघटनांचा विरोध, नाव हटविण्याची मागणी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**छत्रपती संभाजीनगर** – शहरातील जालना रोडवरील केम्ब्रिज चौकात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) माध्यमातून सुमारे पाच कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात येत असलेल्या 'राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ प्रवेशद्वारा'च्या नामफलकावरून वाद निर्माण झाला आहे.

प्रवेशद्वारावर 'संकल्पना' म्हणून सामाजिक न्यायमंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट यांचे नाव नमूद करण्यात आल्याने मराठा समाजातील नागरिकांसह विविध संघटनांनी आक्षेप घेतला आहे. सार्वजनिक निधीतून उभारण्यात येणाऱ्या प्रवेशद्वारावर राजकीय व्यक्तीचे नाव लिहिण्याची आवश्यकता काय, असा सवाल विरोधकांनी उपस्थित केला आहे.

# तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा

## तालुका कांग्रेस कमेटीची मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – वरुड तालुका कांग्रेस कमेटी तर्फे तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा या मागणीसाठी तहसील कार्यालय येथे निवेदन देण्यात आले.

तालुका दुष्काळग्रस्त घोषीत करावा अन्यथा कांग्रेस पक्ष रस्त्यावर उतरुन तिव्र आंदोलन करेल, असा इशारा देण्यात आला.

यावेळी तालुकाध्यक्ष राहुल बोडखे, माजी तालुकाध्यक्ष बाबाराव बोहरूपी, जेष्ठ कांग्रेस सदस्य व्हि.आर. देशमुख, विकास ठाकरे, महिला तालुका, कांग्रेस अध्यक्षा प्रवीणा बोहरूपी, अल्पसंख्याक सेल तालुकाध्यक्ष अब्दुल शरीफ शेख, अनुसचीत जाती व जमाती तालुका अध्यक्ष राजन सोनुले, आदीवासी सेल तालुकाध्यक्ष राजु युवनाते, ओबीसी सेल तालुकाध्यक्ष सुनिल काकडे, ज्ञानेश्वर लांडगे, प्रसिद्धी प्रमुख मनिष धोटे, अमोल बोहरूपी, जयंत मस्की, निलेश अधव, मनीष कडु, डॉ.मनोज उमेकर, चेतन देवते, फुलोर घोरमाडे, पराग लांगापुरे, अरविंद गायकवाड, ॲड.पवन वाडीवे, संतोष टिंगणे, प्रशांत मानकर, तानाजी नाकट, पियुष पडोळे उपस्थित होते.

श्रमजीवी फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या ११व्या वर्धापन दिनानिमित्त

# दर्जेदार व निर्यातक्षम संत्रा उत्पादन तंत्रज्ञानावर मार्गदर्शन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी केवळ उत्पादन वाढविण्यावर भर न देता बाजारपेठेच्या गरजेनुसार दर्जेदार, वजनदार, आकर्षक आणि टिकाऊ फळिनर्मिती करण्याची गरज आहे.

दर्जेदार व निर्यातक्षम संत्रा उत्पादनासाठी आधुनिक तंत्रज्ञान, संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन, योग्य पाणी नियोजन आणि काढणीपश्चात तंत्रज्ञान यांचा प्रभावी वापर आवश्यक असल्याचे प्रतिपादन वरुड येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आले.

श्रमजीवी फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या ११व्या वर्धापन दिनानिमित्त जेनक्रेस्ट बायो प्रॉडक्ट्स प्रा.लि.मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने संत्रा उत्पादकांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास विद्यार्थी, श्रमजीवी फार्मर प्रोड्युसर कंपनीचे सभासद आणि संत्रा उत्पादक शेतकरी असे एकूण सुमारे १५० जण उपस्थित होते. संत्रा उत्पादन तंत्रज्ञानासोबतच बाजारपेठेच्या गरजा आणि संत्रा खरेदी धोरण याबाबतही यावेळी सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रमास विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी आणि कृषी विद्यापीठाचे तज्ज्ञ उपस्थित होते. घोरपडे यांनी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधत आधुनिक संत्रा शेतीतील विविध बाबींवर मार्गदर्शन केले. बदलते हवामान, पाण्याची उपलब्धता, बागेचे नियोजन आणि दर्जेदार उत्पादनासाठी शास्त्रीय व्यवस्थापनाचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अचलपूरचे फळपिक समिती चमु प्रमुख डॉ.राजेंद्र वानखेडे यांनी संत्र्यातील फळगळ नियंत्रण या महत्त्वाच्या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. फळगळ होण्यामागील विविध कारणे, अन्नद्रव्यांचे संतुलन, पाणी व्यवस्थापन आणि बागेची अवस्था यांचा विचार करून फळगळ नियंत्रणाचे नियोजन करण्याची आवश्यकता त्यांनी स्पष्ट केली.

## संपादकीय

**{ गर्दीचा हिस्सा बनण्यापेक्षा गर्दीचे कारण बना. }**

# अमेरिकन निर्बंधांमुळे भारतापुढे तीन कठीण पर्याय

**स्वायत्त परराष्ट्र धोरण, ऊर्जा सुरक्षा आणि जागतिक संतुलनाची कठीण कसोटी**

जागतिक राजकारणात महासत्तांच्या संघर्षाचे परिणाम आता केवळ युद्धभूमीपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. आर्थिक निर्बंध, व्यापारातील अडथळे, तंत्रज्ञानावरील नियंत्रण आणि चलनव्यवस्थेचा वापर ही नव्या काळातील प्रभाव टाकण्याची प्रमुख साधने बनली आहेत. अमेरिका आपल्या परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणून विविध देशांवर आर्थिक निर्बंध लावत असते आणि त्याचा परिणाम त्या देशांशी व्यवहार करणाऱ्या इतर राष्ट्रांवरही होतो. भारतासारख्या उदयोन्मुख महासत्तेसाठी ही परिस्थिती अधिक गुंतागुंतीची ठरते. कारण भारताचे अमेरिका, रशिया, इराण आणि इतर अनेक देशांशी स्वतंत्र आणि महत्त्वाचे संबंध आहेत. अशा वेळी अमेरिकन निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर भारतापुढे तीन कठीण पर्याय उभे राहतातअमेरिकेच्या धोरणाशी पूर्ण सुसंगत राहणे, राष्ट्रीय हितासाठी स्वतंत्र भूमिका कायम ठेवणे किंवा दोन्हींत संतुलन साधत बहुध्रुवीय परराष्ट्र धोरण अधिक मजबूत करणे.

भारताची परराष्ट्रनीती स्वातंत्र्यानंतरपासूनच 'रणनीतिक स्वायत्तता' या तत्त्वावर आधारित राहिली आहे. शीतयुद्धाच्या काळात गुटनिरपेक्ष चळवळ असो किंवा आजच्या काळातील बहुपक्षीय सहकार्य, भारताने कोणत्याही एका गटात पूर्णपणे बांधील राहण्याऐवजी स्वतःच्या हिताचा मार्ग स्वीकारला आहे. मात्र जागतिक अर्थव्यवस्था परस्परावलंबी झाल्यानंतर निर्बंधांचा दबाव अधिक परिणामकारक ठरू लागला आहे.

पहिला पर्याय : अमेरिकेच्या निर्बंधांचे पूर्ण पालन

भारत अमेरिकेचा महत्त्वाचा रणनीतिक भागीदार आहे. संरक्षण, तंत्रज्ञान, सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता, अवकाश संशोधन आणि व्यापार अशा अनेक क्षेत्रांत दोन्ही देशांतील सहकार्य वाढत आहे. अमेरिकेच्या निर्बंधांचे पूर्ण पालन केल्यास भारताला या सहकार्याचा लाभ अधिक वेगाने मिळू शकतो. परदेशी गुंतवणूकदारांचा विश्वास वाढू शकतो आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान भारतात येण्यास मदत होऊ शकते.

परंतु या पर्यायाची किंमतही मोठी असू शकते. उदाहरणार्थ, भारताच्या संरक्षण व्यवस्थेतील मोठा हिस्सा रशियन शस्त्रास्त्रांवर आधारित आहे. एस-४०० हवाई संरक्षण प्रणालीपासून अनेक लष्करी उपकरणांपर्यंत रशियाशी दीर्घकालीन संबंध आहेत. त्याचप्रमाणे इराणसारख्या देशांकडून स्वस्त ऊर्जा मिळवण्याची संधीही भारतासाठी महत्त्वाची ठरली आहे. अमेरिकन निर्बंधांचे अक्षरशः पालन केल्यास ऊर्जा खर्च वाढू शकतो, संरक्षण व्यवस्थेतील सातत्य बिघडू शकते आणि भारताच्या स्वायत्त परराष्ट्र धोरणावर प्रश्न निर्माण होऊ शकतात.

दुसरा पर्याय : राष्ट्रीय हिताला प्राधान्य देत स्वतंत्र भूमिका

भारताने अनेक वेळा स्पष्ट केले आहे की त्याचे निर्णय भारतीय नागरिकांच्या हिताच्या आधारे घेतले जातील. रशिया-युक्रेन युद्धानंतर भारताने रशियन कच्च्या तेलाची खरेदी सुरू ठेवली आणि त्यामुळे देशांतर्गत इंधन व्यवस्थेवर होणारा आर्थिक ताण काही प्रमाणात कमी झाला. ही भूमिका भारताच्या स्वतंत्र निर्णयक्षमतेचे उदाहरण मानली जाते.

# बळीराजाच्या मदतीसाठी शासन बांधावर

## संकटाच्या काळात महाराष्ट्र शेतकऱ्यांच्या पाठीशी!

शेतकऱ्याच्या शेतात उभे असलेले पीक म्हणजे केवळ शेतीतील उत्पादन नसते; त्यामागे संपूर्ण कुटुंबाची स्वप्ने, मुलांच्या शिक्षणाची आशा, घरखर्चाची तरतूद आणि वर्षभराच्या कष्टाचे फळ दडलेले असते. त्यामुळे पावसाने दडी मारली, जमिनीतील ओलावा कमी झाला आणि डोळ्यांसमोर उभे असलेले पीक करपू लागले की त्याची झळ केवळ शेतापुरती मर्यादित राहत नाही. ती संपूर्ण कुटुंबाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनावर परिणाम करत असते.




महाराष्ट्रातील काही भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या अडचणींचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांचा दौरा केला. शेतांमध्ये जाऊन त्यांनी पिकांची पाहणी केली, शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

राज्यातील सध्याच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी केवळ प्रशासकीय अहवाल आणि आकडेवारी पुरेशी नसते. शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती समजून घेणे, शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकणे आणि स्थानिक पातळीवरील अडचणी जाणून घेणे तितकेच महत्त्वाचे ठरते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्यात पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. विशेषतः धाराशिव जिल्ह्यातील पाहणीदरम्यान शेतकऱ्यांच्या परिस्थितीची माहिती घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी राज्य शासनाची भूमिका स्पष्ट केली.

दुष्काळाचा सामना करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्यात येतील आणि त्यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. संकटाच्या काळात मदतीसाठी निधीची अडचण निर्माण होऊ नये आणि आवश्यक उपाययोजना वेळेत करता याव्यात, यासाठी शासनस्तरावर आवश्यक निर्णय घेतले जातील, असे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्याच्या वर्षभराच्या कष्टाचे अंतिम फलित पीक असते. तेच पीक संकटात सापडले तर त्याचा थेट परिणाम त्याच्या उत्पन्नावर होतो. त्यामुळे पीक नुकसानीबाबत शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्यात येईल, अशी महत्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा आधार मिळावा, यासाठी आवश्यक प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

दुष्काळाच्या परिस्थितीत पिकांइतकाच महत्त्वाचा प्रश्न आहे तो पिण्याच्या पाण्याचा. त्यामुळे पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी या दौऱ्यादरम्यान स्पष्ट केले. त्याचबरोबर जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था करण्यासोबतच शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांसाठी अन्नधान्याची व्यवस्था केली जाणार आहे. दुष्काळाची झळ केवळ शेतीला बसत नाही, तर त्याचा परिणाम कुटुंबाच्या रोजच्या गरजांवरही होतो. त्यामुळे पाणी, चारा आणि अन्नधान्य या मूलभूत गरजांचा एकत्रित विचार करून उपाययोजना करणे आवश्यक आहे. मदत जाहीर झाल्यानंतर ती प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत पोहोचणे तितकेच महत्त्वाचे असते. या दृष्टीने शेतकऱ्यांना थेट मदत त्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल आणि शासन त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी दिला आहे.

संकटाच्या काळात आर्थिक मदत थेट शेतकऱ्यापर्यंत पोहोचल्याने त्याला तातडीच्या गरजा भागविण्यासाठी आधार मिळू शकतो. राज्यातील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळसदृश परिस्थितीशी संबंधित उपाययोजनांची प्रक्रिया सुरू आहे. बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी, पंचनामे आणि मदतीसाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही यांचा आढावा घेतला जात आहे. दुष्काळ निवारणासाठी मंत्रिमंडळ उपसमितीही स्थापन करण्यात आली असून परिस्थितीनुसार पुढील निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. केंद्राच्या मदतीची प्रक्रिया सुरू असतानाच राज्यस्तरावरही आवश्यक उपाययोजनांची तयारी ठेवण्यात आली आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीत सर्वात मोठी चिंता पाण्याची असते. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जनावरांसाठी चारा आणि पाणी, उपलब्ध जलसाठ्यांचे नियोजन तसेच पुढील काळातील गरजा यांचा विचार करावा लागतो. पावसाच्या खंडाचा परिणाम केवळ चालू खरीप हंगामापुरता मर्यादित राहत नाही; त्याचा परिणाम पुढील हंगामाच्या नियोजनावरही होऊ शकतो. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्यांचा योग्य वापर आणि भविष्यातील पाणी-चारा गरजांचे नियोजन करणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांच्या नुकसानीची दखल घेताना पीक विमा, आपत्ती निवारणाच्या तरतुदी आणि शासनाच्या विविध योजनांमधून उपलब्ध होणाऱ्या मदतीचाही विचार केला जात आहे. बाधित भागातील वस्तुस्थिती, पिकांचे नुकसान आणि स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील मदतीबाबत निर्णय घेतले जात आहेत. अशा वेळी शेतकऱ्यांना उपलब्ध असलेली मदत वेळेत मिळणे आणि त्यासाठीची प्रशासकीय प्रक्रिया सुलभ राहणे महत्वाचे ठरते.

या संकटाच्या काळात शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्यालाही विशेष महत्व आहे. करपलेली पिके, कोरडी पडलेली शेतजमीन, पाण्याची चिंता आणि पुढील हंगामाचे नियोजन या सगळ्याचा परिणाम शेतकरी कुटुंबावर होत असतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे म्हणणे प्रत्यक्ष ऐकून घेणे आणि त्यानुसार प्रशासनाला आवश्यक सूचना देणे हा संकट व्यवस्थापनातील महत्वाचा भाग ठरतो. मुख्यमंत्र्यांचा लातूर,धाराशिव आणि सोलापूर दौरा याच दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.

दरम्यान, राज्यातील इतर भागांतील परिस्थितीचाही शासनस्तरावर आढावा घेतला जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील कलोरी तसेच मोताळा तालुक्यातील खडकी खामखेड,रोहिनखेड व टाकळी येथे व अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील धधम व व्याळा या गावांना भेट देऊन पाहणी केली आणि बळीराजाला धीर दिला.तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत संवेदनशीलता व्यक्त करत बाधित भागांतील परिस्थिती जाणून घेण्यावर भर दिला आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतीसमोर पावसाच्या अनिश्चिततेचे मोठे आव्हान उभे आहे. अशा वेळी शेतकऱ्याच्या नुकसानीची वस्तुनिष्ठ नोंद, वेळेवर मदत, पाणी आणि चाऱ्याचे नियोजन तसेच पुढील हंगामासाठी आवश्यक आधारव्यवस्था या बाबी महत्त्वाच्या ठरतात. राज्य शासन आणि प्रशासनाच्या उपाययोजनांचा केंद्रबिंदू शेतकरी आणि त्याचे कुटुंब राहणे आवश्यक आहे.

बळीराजाच्या बांधावर पोहोचून परिस्थिती समजून घेणे म्हणजे केवळ पाहणी नव्हे, तर प्रत्यक्ष वास्तव निर्णयप्रक्रियेपर्यंत पोहोचवण्याची प्रक्रिया आहे. आज शेतकरी ज्या परिस्थितीतून जात आहे, त्याची तीव्रता लक्षात घेऊन मदतीची अंमलबजावणी वेळेत आणि प्रभावीपणे होणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाच्या निर्णयांसोबतच प्रशासनाची प्रभावी अंमलबजावणी आणि स्थानिक पातळीवरील समन्वयही तितकाच महत्त्वाचा आहे.

शेतकऱ्याच्या कष्टाचे आणि नुकसानीचे योग्य मूल्यमापन करून त्याला उपलब्ध असलेल्या मदतीचा लाभ वेळेत मिळणे, हीच या संपूर्ण प्रक्रियेची खरी कसोटी ठरणार आहे. पीक नुकसानीसाठी सरसकट मदत, पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य, जनावरांसाठी चारा, शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांसाठी अन्नधान्याची व्यवस्था तसेच थेट खात्यात जमा होणारी मदत या माध्यमातून संकटाच्या काळात शेतकरी कुटुंबाला आधार देण्याचा हा प्रयत्न आहे.

बळीराजाच्या शेतात पुन्हा हिरवाई यावी, त्याच्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळावे आणि पुढील हंगामासाठी त्याचा विश्वास कायम राहावा, यासाठी तातडीच्या उपाययोजनांसोबतच पुढील काळाचे नियोजनही आवश्यक आहे. आजच्या परिस्थितीत शासन, प्रशासन आणि स्थानिक यंत्रणा यांच्यातील समन्वय महत्वपूर्ण ठरणार आहे. बळीराजा संकटात असताना घेतलेले निर्णय आणि तो शेतकऱ्यापर्यंत पोहोचण्याचा वेग, या दोन्ही गोष्टी महत्वाच्या असतात.

महाराष्ट्राचा शेतकरी संकटांना न घाबरता पुन्हा उभा राहण्याची ताकद ठेवतो. त्याला गरज आहे ती योग्य वेळी मिळणाऱ्या आधाराची.

बळीराजाच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य यावे, त्याच्या शेतात पुन्हा हिरवाई नांदावी, त्याच्या कुटुंबाच्या डोळ्यांत पुन्हा सुखी भविष्याची स्वप्ने दिसावीत आणि त्याच्या कष्टाला योग्य आधार मिळावा, यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. शेतकरी हा महाराष्ट्राचा अन्नदाता आहे. त्याच्या कष्टाचा सन्मान करणे, त्याच्या संकटात त्याच्या पाठीशी उभे राहणे आणि त्याला पुन्हा उभारी देणे ही शासनाची जबाबदारी आहे. आज बळीराजाच्या बांधावर पोहोचलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्याला एकच विश्वास देत आहेत - संकट कितीही मोठे असो, महाराष्ट्राचा शेतकरी एकटा नाही. राज्य शासन त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

**वर्षा फडके - आंधळे**
**उपसंचालक (वृत्त)**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# काँग्रेसच्या 'ताठ कण्या'चा असाही इतिहास...



डिसेंबर १९८४ मध्ये भोपाळ वायू दुर्घटना घडली. या दुर्घटनेत हजारो नागरिकांचा मृत्यू झाला. युनियन कार्बाइडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँडर्सन यांना अटक करण्यासाठी गेलेल्यांना दिल्लीतून रोखण्यात आले. दिल्लीहून अँडरसन मायदेशी परतले. हाच काँग्रेसचा ताठ कणा.

युपीआय व्यवहारांसाठी सामान्य ग्राहकांकडून नव्हे तर व्यापाऱ्यांकडून नाममात्र कर वसूल करण्याच्या मुद्द्यावरून 'दिमागी नक्षली' टोळीचे सरदार राहुल गांधी पुड्याची तलवार घेऊन पुन्हा मैदानात आले आहेत. 'हा कर रद्द करा, अमेरिकेसमोर झुकू नका, ताठ कणा दाखवा,' अशी शाब्दिक फुलबाजी राहुल गांधींनी केली आहे. राजकारणात सत्ताधारी पक्षाला विरोधी पक्षाने विरोध करणे अभिप्रेतच आहे. संसदीय लोकशाहीचा हाच आत्मा आहे. मात्र विरोधकाची भूमिका बजावणाऱ्या नेत्याला पक्षाला तारतम्य नसेल, राजकीय आकलनशक्ती नसेल तर तो नेता आक्रस्ताळा बनून आपले हसे कसे करून घेतो याचे राहुल गांधी हे उत्तम उदाहरण आहे. मोदी सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध करून प्रसिद्धीचा झोत आपल्याकडे वळिवण्याचा राहुल गांधी सातत्याने प्रयत्न करीत असतात. युपीआय व्यवहारांवर एमडीआर शुल्क लावण्याच्या निर्णयाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना राहुल गांधींनी सवयीप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. पंतप्रधान मोदी यांनी ताठ कणा दाखवावा, अमेरिकेसमोर झुकू नये आणि हे शुल्क रद्द करावे, असे वक्तव्य राहुल गांधींनी केले आहे. आपण आक्रमक विरोधी नेते आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न करणाऱ्या राहुल गांधींना त्यासाठी बिनबुडाची वक्तव्ये करण्याची सवय लागली आहे. असे बोलल्यामुळे राहुल गांधींना सर्वोच्च न्यायालयापुढे माफी मागावी लागली आहे, तरीही त्यांची बेताल बडबड करण्याची सवय काही सुटत नाही. राफेल लढाऊ विमाने खरेदी मध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप करताना राहुल गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल अत्यंत अवमानास्पद भाषा वापरली होती. कोणतेही पुरावे नसताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आरोप केल्याबद्दल राहुल गांधींना सर्वोच्च न्यायालयापुढे नाक घासत माफी मागावी लागली होती.

युपीआय वरील शुल्काचे निमित्त करून राहुल गांधींनी नेहमीप्रमाणे खोटी नाटी माहिती पसरवून जनतेच्या मनात संभ्रम पसरविण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. सरकारने ताठ कणा दाखववा वगैरे वगैरे बाष्कळ बडबड करताना आपण २००४ ते २०१४ या काळात कितींदा ताठ कणा दाखवला , आपल्या पिताश्रींनी, आज्जीने कसा ताठ कणा दाखवत अमेरिकेपुढे, पाकिस्तानपुढे शरणागती पत्करली होती याचे इतिहासातील अनेक पुरावे राहुल गांधींना दाखवावे लागतील. अर्थात या पुरव्यांकडे राहुल गांधी सवयीप्रमाणे दुर्लक्ष करतील आणि आपली झूठ की गुंज सुरु करतील यात काही शंका नाही. २००४ ते २०१४ या काळात डॉ . मनमोहन सिंग यांचे सरकार सत्तेत असताना राहुल गांधी आणि त्यांच्या मातोश्री श्रीमती सोनिया गांधी यांच्याकडे सरकारचा रिमोट कंट्रोल होता. या दहा वर्षांत देशात पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी थैमान घातले होते. पाकिस्तानी दहशतवादी मनात येईल तेव्हा भारतात बॉम्बस्फोट करत होते. मनमोहन सरकार दहशतवाद्यांचा निषेध करण्याखेरीज काहीच करीत नव्हते. त्यामुळे पाकिस्तानने २६ नोव्हेंबर २००८ रोजी दहशतवादी पाठवून मुंबईवर हल्ला चढविला. मूठभर अतिरेक्यांनी त्यावेळी संपूर्ण देशाला वेठीस धरले होते. पाकिस्तानने एवढी मोठी आगळीक करूनही काँग्रेसच्या मनमोहन सरकारने त्याबद्दल निषेधाचे कागदी खलिते पाठ्वण्याखेरीज काहीही केले नाही.

त्यावेळी राहुल गांधींना आपल्या मातोश्रींना, मनमोहन सिंग यांना ताठ कणा दाखवा आणि पाकिस्तानला धडा शिकवा, असे सांगण्याची हिम्मत दाखविता आली नव्हती. सप्टेंबर २०१३ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेदरम्यान त्यावेळचे पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी आपले पंतप्रधान डॉ . मनमोहन सिंग यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्यानंतर राहुल गांधींनी शरीफ यांचा निषेध करण्याचे धाडस दाखविले नव्हते.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# अंबानींना मागे टाकत अदानी पुन्हा श्रीमंतांच्या यादीत अव्वल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – गौतम अदानी आणि त्यांच्या कुटुंबाने मुकेश अंबानी यांना मागे टाकत पुन्हा एकदा भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्तीचा दर्जा मिळवला आहे. हुरुन रिपोर्टनुसार, अदानी यांची संपत्ती १३ टक्क्यांनी वाढून? ९.२३ लाख कोटी (९६ अब्ज डॉलर) झाली आहे. तर मुकेश अंबानी यांची संपत्ती १० टक्क्यांनी घटून ?८.६३ लाख कोटी झाली आहे. दोन्ही उद्योजकांच्या संपत्तीत सध्या ? ५९,४०० कोटींचा फरक आहे. गेल्या पाच वर्षांत पहिल्या दोन स्थानांमध्ये पाच वेळा बदल झाला आहे. २०२२ मध्ये अदानी अव्वल आले. २०२३ मध्ये अंबांनींनी ते स्थान परत मिळवले. २०२४ मध्ये पुन्हा अदानी, २०२५ मध्ये अंबानी, २०२६ मध्ये पुन्हा अदानी यांनी अव्वल स्थान पटकावले आहे.

# राजकीय पक्षांनी आचार संहितेचे काटेकोर पालन करावे : विभागीय आयुक्त नयना गुंडे

## अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक : राजकीय पक्षांच्या बैठकीत विभागीय आयुक्तांचे आवाहन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**अमरावती** – अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर झाला आहे. यादरम्यान, राजकीय पक्षांनी प्रचार सभा व रॅली घेताना आदर्श आचार संहितेच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी नयना गुंडे यांनी आज येथे केले.

अमरावती विभाग शिक्षक मतदार संघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात राजकीय पक्षांची बैठक पार पडली. त्यावेळी त्या बोलत होत्या.

भारत निवडणूक आयोगाने अमरावतीसह राज्यातील चार विभागांतील महाराष्ट्र विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या जागासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. कार्यक्रम जाहिर झाल्यापासूनच विभागात आदर्श आचार संहिता लागू झाली असून त्यात विहित सूचना व नियमांचे राजकीय पक्षांनी काटेकोरपणे पालन करावे, विभागातील पाचही जिल्ह्यांमध्ये प्रचारसभा व रॅली घेण्याकरिता विभागीय आयुक्त कार्यालयात परवानगी मिळेल तसेच एकच प्रचार सभा असेल तर संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयातून परवानगी देण्यात येईल,या कालावधीत वाहन वापरण्याबाबत निश्चित करण्यात आलेल्या नियमानुसार कार्यवाही व्हावी ,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या निवडणूक कालावधी दरम्यान विभागातील ५ जिल्हाधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळतील. प्रचारसभा आयोजनासाठी शाळा व महाविद्यालय परिसर टाळावा, सामाजिक तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घेवून सभा व रॅली आयोजन व्हावे, असेही त्यांनी सांगितले. निवडणूक कार्यक्रम तसेच आचार संहिता काळात 'काय करावे व काय करू नये!' आदींबाबत त्यांनी उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना माहिती दिली.

सामान्य प्रशासन अपर आयुक्त संजय जाधव, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शिवाजी शिंदे यावेळी उपस्थित होते.

## डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथील

# विद्यार्थ्यांची बुद्धिबळ स्पर्धेत जिल्हास्तरावर निवड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – युवक क्रीडा संचालनालय पुणे तसेच जिल्हा क्रीडा अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने जरुड येथे झालेल्या बुद्धिबळ क्रीडा स्पर्धेत स्थानिक नवयुवक शिक्षण संस्था अंतर्गत डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय बुद्धिबळ क्रीडा स्पर्धेत विजय मिळवून जिल्हास्तरावर निवड झाली आहे.

नुकत्याच झालेल्या बुद्धिबळ क्रीडा स्पर्धेत वयोगट १४ मध्ये वर्ग सातवीतील विद्यार्थी वैदही सदानंद मुंदाने आणि उत्कर्ष संदिप काळबांडे तर वयोगट १७ मध्ये इयत्ता ९वी तील विद्यार्थी वेदांत गजेंद्र खेरडे आणि दहावीतील विद्यार्थिनी मनस्वी नरेंद्र निकोसे यांनी तालुकास्तरावर घवघवीत यश संपादन करून त्यांची आता जिल्हास्तरावर निवड झाली आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक केल्या जात आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे नवयुवक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय गणोरकर, उपाध्यक्ष पुरुषोत्तम कळमकर, सचिव जगदीश नेरकर, शाळेच्या मुख्याध्यापिका निता चिमोटे, आदर्श मराठी प्रायमरी शाळेचे मुख्याध्यापक नितेश वाघमारे तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशांत आंडे व क्रीडा शिक्षक शुभम कडूंन यांचे मार्गदर्शन लाभले.

## जनता शिक्षण संस्थेच्या प्रांगणात

# तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे थाटात उद्घाटन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती यांच्या वतीने तालुकास्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धा २२ व २३ सप्टेंबरला जनता शिक्षण संस्थेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या आहेत. २२ सप्टेंबरला तालुकास्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी, प्राचार्य मनोहर गणोरकर आणि मुख्याध्यापिका डॉ.माया हिवसे व इतर मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. या स्पर्धेमध्ये १४ वर्षे वयोगटातील मुलांचे ११ संघ आणि १४ वर्षे मुलींचे ६ संघ तसेच १९ वर्षे वयोगटातील मुलींनी सहभाग घेतलेला होता.

१९ वर्षे मुलांच्या वयोगटामध्ये श्री एन.जी.मोघे कनिष्ठ महाविद्यालय, शेंदुरजनाघाट हा संघ विजयी तर उर्दू विकास हायस्कूल वरुड हा संघ उपविजयी ठरला तर मुलींच्या १९ वर्षे वयोगटामध्ये श्री.एन.जी.मोघे कनिष्ठ महाविद्यालय हा संघ विजयी तर जागृत हायस्कूल वरुडच्या मुलींचा संघ उपविजयी ठरला. १४ वर्षे मुलांच्या वयोगटामध्ये वसंतराव नाईक हायस्कूल जरुड हा संघ विजयी तर जनता हायस्कूल शेंदुरजनाघाट हा संघ उपविजयी ठरला. १४ वर्षे मुलींच्या वयोगटामध्ये आर.सी.हायस्कूल लोणी हा संघ विजयी तर न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेन्ट वरुड हा संघ उपविजयी ठरला.

तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये विजयी व उपविजयी ठरलेल्या सर्व संघांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले. या स्पर्धेच्या आयोजनाकरिता प्राचार्य मनोहर गणोरकर, पर्यवेक्षक उमेश काळे, पर्यवेक्षक योगेश सावरकर, क्रीडाशिक्षक प्रा.प्रशांत चर्जन, प्रविण गणोरकर, संजय डोक, योगेश अकर्ते, योगेश फुटाणे, प्रविण आकोटकर, विकिसिंग अंद्रेले व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले तसेच या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून संस्कार सावरकर, नकुल बेलसरे, गोलु लिखितकर व अक्षय डोंगरे यांनी काम पाहिले.

# जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे विशेष अभियान

## प्रलंबित अर्जदारांसाठी त्रुटीपूर्तता शिबिर, मार्गदर्शन सत्रे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीतर्फे सेवा संकल्प अभियानात शैक्षणिक प्रवेश आणि प्रलंबित अर्जांच्या त्रुटीपूर्ततेसाठी विशेष शिबिर, वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये अकरावी आणि विज्ञान शाखेत बारावी, तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केले आहेत, मात्र ज्यांचे अर्ज त्रुटीअभावी समितीकडे प्रलंबित आहेत, अशा अर्जदारांसाठी हे शिबिर घेण्यात येत आहे.

अर्जदारांनी आवश्यक त्रुटींची पूर्तता करण्यासाठी अमरावती येथील कार्यालयात प्रत्यक्षात उपस्थित राहण्यासाठी दि. २५ सप्टेंबर, दि. ५ ऑक्टोबर, दि. ८ ऑक्टोबर, दि. १२ ऑक्टोबर या तारखा निश्चित करण्यात आल्या आहेत. तसेच तालुक्यातील सर्व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील मुख्याध्यापक व शिक्षकांसाठी दि. २९ सप्टेंबर आणि दि.६ ऑक्टोबर रोजी वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

जात वैधता प्रमाणपत्राबाबत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी दि.७ ऑक्टोबर रोजी शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती आणि दि.१३ ऑक्टोबर रोजी श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी व पालकांनी या मार्गदर्शन शिबिरांचा आणि त्रुटीपूर्तता शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या उपायुक्त तथा सदस्य जया राऊत यांनी केले आहे.

# भारताचा विकास दर अंदाज उंचावला!

## एस अँड पी, फिचसह आंतरराष्ट्रीय संस्थांना विश्वास, महागाईमुळे व्याजदर वाढीची शक्यता




(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – जून तिमाहीतील मजबूत आर्थिक हालचाली आणि पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवरही टिकून राहिलेली अंतर्गत मागणी या घटकांमुळे एस अँड पी, फिच, एशियन डेव्हलपमेंट बँक (एडीबी) आणि ओईसीडी या प्रमुख जागतिक संस्थांनी बुधवारी भारताचा आर्थिक वर्ष २०२६-२७ साठीचा जीडीपी वाढीचा अंदाज वाढवून ७ टक्क्यांच्या आसपास केला आहे.

याशिवाय, महागाईच्या दबावामुळे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया चालू वर्षात धोरणात्मक व्याजदरात किमान २५ बेसिस पॉईंट्सची वाढ करेल, असा अंदाज एस अँड पी आणि फिचने व्यक्त केला आहे.

गेल्या आठवड्यात अमेरिकास्थित मुडीज रेटिंग्सने चालू आर्थिक वर्षासाठी भारताचा जीडीपी विकास दर ७ टक्के (जी२० देशांमध्ये सर्वाधिक) वर्तवल्यानंतर या चार जागतिक संस्थांनी ही वाढ जाहीर केली आहे.

# भाजपने भाकरी फिरवली, संघटनेत खांदेपालट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**नवी दिल्ली** – भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी २८ राज्ये आणि आठ केंद्रशासित प्रदेशांसाठी प्रभारी आणि सह प्रभारींची नियुक्ती केली आहे. भाजपाच्या दिल्लीचे प्रभारी म्हणून विनय सहस्त्रबुद्धे यांची नियुक्ती करण्यात आली असून पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांची उत्तर प्रदेशचे प्रभारी म्हणून तर जगदीश पटेल, मेधा कुलकर्णी, प्रदीप वर्मा आणि आनंद यांची सहप्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, बैजयंत 'जय' पांडा यांना महाराष्ट्राचे प्रभारी बनवण्यात आले आहे.

भाजपाने यात्व्यतिरिक्त संजय भाटिया यांची राजस्थानचे प्रभारी म्हणून नियुक्ती केली असून, कविता पाटीदार आणि कुलजीत चहल यांची सहप्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राम माधव यांची तामिळनाडूसाठी, राजदीप रॉय यांची मणिपूरसाठी, डी. पुरंदेश्वरी यांची ओडिशासाठी, सुनील बन्सल यांची तेलंगणा आणि पश्चिम बंगालसाठी, बिप्लव देब यांची मध्य प्रदेशसाठी आणि भारती पवार यांची गोव्यासाठी भाजप प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. भाजपने सतीश पुनिया यांची पंजाब आणि जम्मू-काश्मीरचे प्रभारी म्हणूनही नियुक्ती केली.

स्मृती इराणी बनल्या हरियाणा, छत्तीसगडच्या प्रभारी त्याचप्रमाणे स्मृती इराणी यांची हरियाणा आणि छत्तीसगडसाठी भाजपा प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, तर हरीश द्विवेदी यांची बिहार आणि कर्नाटकसाठी आणि तरुण चुघ यांची गुजरातसाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेच्या लाभासाठी प्रलंबित ई-केवायसी तात्काळ पूर्ण करा : जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

## दहा दिवसांत ६० टक्के शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करावे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**अमरावती** – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत ई-केवायसीअभावी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांची तात्काळ ई-केवायसी करावी, तसेच कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना येत्या दहा दिवसात पीक कर्ज वाटप करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरकर यांनी दिले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ, जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक सुनील पाण्डेय, स्टेट बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक आशिष सिंह उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरकर यांनी कर्जमाफी योजनेंतर्गत प्रलंबित असलेली ई-केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित बँकर्स, तसेच सहकार विभागाला दिले. पात्र लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रक्रिया प्रलंबित राहणार नाही, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करून त्याचा नियमित आढावा घेण्याच्या सूचनाही देण्यात आली. पात्र शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करून देताना ना देय प्रमाणपत्राची अनावश्यक अट लागू करू नये, तसेच केवळ सिबील स्कोरच्या आधारे पीक कर्ज नाकारू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी यांनी बँकांना दिले. तथापि, संबंधित शेतकऱ्याचे इतर कर्ज थकीत असल्यास, पीक कर्ज मंजूर करताना संबंधित बँकेची कर्जविषयक धोरणे तसेच आरबीआयच्या लागू मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले.

जिल्ह्यात आतापर्यंत ५६ हजार ९०५ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळालेला आहे. त्यापैकी केवळ ४ हजार ७०३ शेतकऱ्यांना नवीन पीककर्ज वाटप करण्यात आले आहे. कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी कर्जवाटपाची गती तातडीने वाढवावी. पात्र शेतकऱ्यांपर्यंत संस्थात्मक कर्जपुरवठा प्रभावीपणे पोहोचविण्याचे व पुढील १० दिवसात ६० टक्के शेतकऱ्यांना कर्जवाटप करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

बैठकीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांना वेळेत नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी बँका, सहकार विभाग व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने व मिशन मोडमध्ये कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी येरकर यांनी दिल्या.

# बीएमसी अधिकाऱ्याची इगतपुरीत हत्या ! महिलेसह तिच्या दोन मुलांना अटक : हत्येचे धक्कादायक कारण समोर

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नाशिक** – गणेशोत्सवाच्या सुट्टीसाठी मूळ गावी आलेल्या मुंबई महापालिकेच्या एका अधिकाऱ्याची इगतपुरी तालुक्यात हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रात्री एका महिलेसोबत बोलत असलेल्या अधिकाऱ्यावर महिलेने आणि तिच्या दोन




मुलांनी हल्ला केल्याचा आरोप आहे. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या अधिकाऱ्याचा मृत्यू झाला. मृत अधिकाऱ्याचे नाव राधाकिसन तुकाराम वारघडे (वय ५३, रा.गरुडेश्वर, ता. इगतपुरी) असे आहे. या प्रकरणी पोलिसांनी एका महिलेसह तिच्या दोन मुलांना अटक केली असून, न्यायालयाने तिघांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. अनैतिक प्रेमसंबंधातून ही थरारक हत्या घडल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. लठ्याकाठ्यांनी मारहाण, डोक्यातही प्रहार

मिळालेल्या माहितीनुसार, बीएमसी अधिकारी राधाकिसन वारघडे हे गणेशोत्सवानिमित्त सुट्टी काढून आपल्या गरुडेश्वर या मूळ गावी आले होते. मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास ते गावातीलच संशयित महिला वंदना कुंदे हिच्या घराजवळ गेले होते आणि तिच्याशी बोलत उभे होते.

# पुन्हा एकदा 'जमुई कांड'! अल्पवयीन मुलीचा भरदिवसा छळ

**व्हिडिओ व्हायरल होताच ४ आरोपी अटकेत**

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

***बिहार*** – बिहारमधील जमुई कांड ताजं असतानाच पुन्हा एकदा असाच प्रकार समोर आला आहे. भरदिवसा एका अल्पवयीन मुलीचा छळ केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत ४ आरोपींना अटक केली आहे. ही घटना १५ सप्टेंबर रोजी



घडल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, समस्तीपूरमधील कर्पुरीग्राम पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जगतसिंगपूर गावाजवळील धरण परिसरात हा प्रकार घडला. मिळालेल्या माहितीनुसार, एक अल्पवयीन मुलगा आणि मुलगी दुचाकीवरून धरण परिसरात गेले होते. दोघेही तेथे बोलत असताना काही तरुणांनी त्यांना घेरले. यावेळी तरुणांनी मुलाला मारहाण केल्याचा आरोप आहे. त्यानंतर मुलगा तेथून निघून गेला.

# मध्यरात्री ट्रकला कारची भीषण धडक : गाडीचाही झाला चुरा

**झारखंडच्या कॅबिनेट मंत्र्यांच्या मुलीसह ४ जणांचा जागीच मृत्यू, छिन्नविछिन्न अवस्थेतील मृतदेह काढले बाहेर**

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

***झारखंड*** – एक कार आणि ट्रक यांच्यात झालेल्या अत्यंत भीषण अपघातात झारखंडच्या ग्रामीण विकास मंत्री दीपिका पांडे सिंह यांच्या मुलीचा मृत्यू झाला आहे. कारमधील इतर ३ जणांनाही या अपघातात आपले प्राण गमवावे लागले आहेत. हा अपघात बुधवारी उशिरा रात्री घडला असून, धडक इतकी जोरदार होती की कारचा पूर्णपणे चक्काचूर झाला. झारखंडमधील जमशेदपूर जिल्ह्यातील दोमुहानी परिसरात हा भीषण अपघात झाला. येथे कार आणि ट्रकदरम्यान जोरदार



धडक झाली. या अपघातात कारमधील चारही जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये झारखंडच्या ग्रामीण विकास मंत्री दीपिका पांडे सिंह यांच्या मुलीचाही समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दोमुहानीजवळ कार आणि ट्रकची जोरदार धडक झाली. धडक इतकी तीव्र होती की जागीच चौघांचा मृत्यू झाला. अपघातानंतर घटनास्थळी मोठा गोंधळ उडाला. आसपासच्या लोकांना घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी नागरिकांनी गर्दी केली.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि मदत-बचाव पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. पथकाने घटनास्थळी पोहोचून मदत आणि बचावकार्य सुरू केले. या अपघातात कारमधील चार जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. यामध्ये मंत्री दीपिका पांडे सिंह यांच्या मुलीचाही समावेश आहे. अपघातानंतर सर्वाधिक चर्चा झारखंडच्या ग्रामीण विकास मंत्री दीपिका पांडे सिंह यांच्या मुलीच्या निधनाच्या बातमीची आहे. त्यांची मुलगीही या अपघाताची बळी ठरली. दरम्यान, पोलीस संपूर्ण प्रकरणाचा तपास करत असून घटनेशी संबंधित अधिक माहिती गोळा करत आहेत. मंत्र्यांच्या कुटुंबाने आणि जवळच्या लोकांनी मंत्र्यांच्या मुलीच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. झारखंडचे आरोग्य मंत्री डॉ. इरफान अंसारी यांनीही या अपघातावर दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून या घटनेवर शोक व्यक्त केला. त्यांनी या अपघाताला अत्यंत वेदनादायी म्हटले, तसेच मंत्री दीपिका पांडे सिंह यांच्या मुलीच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले.

# सामाजिक वनीकरणातील घोटाळ्याप्रकरणी गुन्हा दाखल करा : वडूज न्यायालयाचे आदेश

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)

**कराड** – सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यात सामाजिक वनीकरण विभागामार्फत झालेल्या कथित ११ कोटी २१ लाख रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी सामाजिक वनीकरण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह एकूण २३ जणांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्याचे आदेश वडूज न्यायालयाने दिले आहेत. या आदेशाची वडूज पोलीस प्रभावीपणे अंमलबजावणी करणार का, याकडे तक्रारदारांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सन २०१७ ते २०२३ या कालावधीत राज्यात वृक्षलागवडीच्या विविध योजना राबविण्यात आल्या



होत्या. खटाव तालुक्यात या योजनांच्या अंमलबजावणीत मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. वृक्षलागवड न करता तसेच लावलेली झाडे जगविण्यासाठी आवश्यक पाणी व खतांचा वापर न करता कागदोपत्री वृक्षलागवड दाखविण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षलागवड, गट लागवड आणि प्लांटेशन यांसारखी कामे प्रत्यक्षात न करता नातेवाइकांच्या नावे कथित बनावट कागदपत्रे तयार करून सुमारे ११ कोटी २१ लाख रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब चव्हाण यांनी केला आहे. याप्रकरणी कारवाई होत नसल्याने चव्हाण यांनी वडूज येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात १९१/२०२४ क्रमांकाची याचिका दाखल केली होती.

या प्रकरणात राज्याचे मुख्य वनसचिव वेणू गोपाल रेड्डी, हनुमंत धुमाळ, रंगनाथ मनिलाल नाईकडे, सातारा विभागीय वन अधिकारी हरिश्चंद्र वाघमोडे यांच्यासह सामाजिक वनीकरण विभागातील एकूण २३ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे आरोपी म्हणून नमूद करण्यात आली आहेत.

# श्री क्षेत्र कुणकेश्वरच्या पर्यटनाला 'ताज'चा शाही साज!

**'ट्री ऑफ लाइफ'च्या ५० खोल्यांच्या आलिशान हॉटेलसाठी करार**

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – कोकणच्या निसर्गसौंदर्याला जागतिक दर्जाच्या पर्यटन सुविधांची जोड देत सिंधुदुर्गला देश-विदेशातील पर्यटकांचे प्रमुख पर्यटन केंद्र बनविण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील प्रसिद्ध कुणकेश्वर येथे 'ट्री ऑफ लाइफ' या ताज हॉटेल्स ब्रँडच्या आलिशान हॉटेलची उभारणी करण्यात येणार आहे. ५० खोल्यांचे हे हॉटेल २४ महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन असून, यासंदर्भातील करार मंत्रालयात करण्यात आला.

मत्स्य व बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री



नितेश राणे यांच्या उपस्थितीत 'ट्री ऑफ लाइफ' हॉटेलसाठी 'स्टार्टर बिल हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.' आणि 'राजस्केप हॉटेल्स प्रा. लि.' यांच्यात करार झाला.

यावेळी सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, ताज ग्रुपचे तन्वीर जाहीदी, दत्तात्रय हिरे, रोहन रानडे, डॉ.निलेश बानवलीकर आणि ॲड.श्रीपाद महाजन उपस्थित होते. कुणकेश्वर येथे साकारण्यात येणाऱ्या या प्रकल्पात ५० खोल्यांचे आलिशान हॉटेल उभारण्यात येणार आहे. अवघ्या २४ महिन्यांत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन असल्याने धार्मिक पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या कुणकेश्वरला आता जागतिक दर्जाच्या पर्यटन सुविधांची नवी जोड मिळणार आहे.

समुद्रकिनारा, निसर्गसौंदर्य आणि धार्मिक पर्यटन अशी वैशिष्ट्यपूर्ण ओळख असलेल्या देवगड तालुक्यात जागतिक दर्जाचे हॉटेल उभारले जाणार असल्याने देश-विदेशातून येणाऱ्या पर्यटकांना दर्जेदार निवास आणि आतिथ्य सुविधा उपलब्ध होणार आहेत.

# गेल्यावर्षी ३१ हजार कोटींचं पॅकेज जाहीर केलं होतं, प्रत्यक्ष मदत किती शेतकऱ्यांच्या हातात पोहोचली?

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – सरकारने गेल्यावर्षी ३१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते आणि खरडून गेलेल्या जमिनीसाठी हेक्टरी साडेतीन लाख रुपयांची घोषणा केली होती. मात्र, यातील प्रत्यक्ष मदत किती शेतकऱ्यांच्या हातात पोहोचली, याची माहिती महाराष्ट्राला मिळायला हवी.

हवामान खाते व आंतरराष्ट्रीय संस्थांनी मोसमाच्या सुरुवातीलाच दुष्काळाचा अंदाज वर्तवला होता. ही शक्यता लक्षात घेऊन सरकारने आधीपासून दुष्काळ निवारणासाठी काय उपाययोजना केल्या, असा सवाल शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. दुष्काळीच्या पार्श्वभूमीवर



विशेष अधिवेशनाची मागणी ठाकरे यांनी केली. उद्धव ठाकरे यांनी सांगितले की, पावसाअभावी शेतकऱ्यांना दुबार किंवा तिबार पेरणी करावी लागत आहे. परिस्थिती भयानक असून पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, धरणे-विहिरी भरणे आणि आगामी रब्बी हंगामासाठी समाधानकारक पाऊस व्हावा, अशी प्रार्थना उद्धव ठाकरे यांनी केली.

जशी मी कर्जमुक्ती केली होती, आजसुद्धा जिथे जिथे जाल तिथे सगळे शेतकरी सांगतात की १५ दिवसात त्यांना कोणताही निकष वगैरे न तपासता, म्हणजे सरसकट सगळ्यांची २ लाखापर्यंतची कर्जमुक्ती केली होती.

गेल्यावर्षी जाहीर केलेलं पॅकेज किती शेतकऱ्यांना मिळालं, आता तुम्ही जाहीर केलेली कर्जमाफीची योजना, त्यानुसार किती शेतकऱ्यांना लाभ झालेला आहे, याची यादी आम्हाला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

# शाळांच्या ५० मीटर परिसरात जंक-फूडविरोधात कडक नियम



**खाद्यपदार्थांमधील मीठ, साखर अन फॅटची पाहणी होणार**

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

***मुंबई*** – गेल्या सहा वर्षांपासून म्हणजेच २०२० पासून शाळांमध्ये आणि त्यांच्या ५० मीटरच्या परिसरात मीठ, साखर आणि फॅटचे प्रमाण जास्त असलेल्या खाद्यपदार्थांच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. तथापि, सहा वर्षे उलटूनही, या नियमावलीत कोणत्या वस्तूंचा समावेश करावा हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. आता भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने नवीन नियमावलीचा मसुदा प्रसिद्ध केला आहे. या नियमांनुसार, एखादा खाद्यपदार्थ विक्रीसाठी योग्य आहे की नाही, हे त्याच्या पॅकेजमधील मीठ, साखर आणि फॅटच्या प्रमाणावरून ठरवले जाईल. सध्या, चिप्स, बिस्किटे, स्नॅक्स आणि शीतपेये यांसारख्या वस्तूंवर थेट बंदी नाही. विद्यमान नियमांनुसार, शाळांच्या कॅन्टीन, मेस, वसतिगृहे आणि प्रवेशद्वारांच्या ५० मीटरच्या परिसरात अशा खाद्यपदार्थांच्या विक्रीवर, तसेच मुलांना आकर्षित करणाऱ्या जाहिरातींवर बंदी आहे. नवीन नियमांनुसार, मीठ, साखर किंवा फॅटचे किती प्रमाण आरोग्यासाठी हानिकारक मानले जाईल, हे निश्चित केले जाईल.

जंक फूडची यादी अंतिम झालेली नाही आरोग्यदायी मेनूची यादी अद्याप अंतिम झालेली नाही: एफएसएसएआयच्या मते, शाळांसाठी अनिवार्य मेनू (नमुना मेनू) किंवा आरोग्यदायी पर्यायांची यादी यापैकी काहीही अंतिम झालेले नाही. मसुदा अंतिम झाल्यावर प्रतिबंधित उत्पादने ठरवली जातील: पोषणविषयक मसुदा अंतिम झाल्यावरच, पौष्टिक मूल्यांच्या आधारावर ५०-मीटरच्या परिघात कोणत्या खाद्यपदार्थांवर बंदी घातली जाईल हे स्पष्ट होईल.



अमरावती : अमरावती विमानतळावर आगमनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि आमदार रवी राणा यांनी स्वागत केले.

# पर्यावरणपूरक गणेश विसर्जनासाठी संत्रानगरी सज्ज

## नगरपरिषदेने उभारले ३ कृत्रिम तलाव : त्यातच विसर्जन करण्याचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील गणेश विसर्जन पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावे, यासाठी वरुड नगरपरिषदेने विशेष पुढाकार घेत शहरातील ३ महत्त्वाच्या ठिकाणी कृत्रिम तलावांची उभारणी केली आहे. नगरपरिषद मैदान, केदारेश्वर मंदिर परिसर तसेच लक्ष्मीनगर येथील महादेव मंदिर परिसरात हे कृत्रिम तलाव उभारण्यात आले असून, गणेशभक्तांनी नदी, नाले किंवा इतर नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जन न करता या कृत्रिम तलावांमध्येच श्रीगणेशाचे विसर्जन करावे, तसेच या तिन्ही ठिकाणी निर्माल्य कलश सुध्दा ठेवण्यात येणार असून त्यामध्ये निर्माल्य टाकावे, असे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.




या तीनही ठिकाणी विसर्जनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तलाव परिसरात स्वच्छतेची विशेष व्यवस्था करण्यात आली असून, विसर्जन प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी नगरपरिषदेचे कर्मचारी आणि संबंधित यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. विसर्जनानंतर निर्माल्याची योग्य विल्हेवाट लावण्याच्याही सूचना देण्यात आल्या आहेत.

मुख्याधिकारी गजानन भोयर यांनी नागरिकांना पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी लक्षात घेऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. प्रशासनाने उभारलेल्या कृत्रिम तलावांचा वापर करुन पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाला प्राधान्य द्यावे. नदी, नाले किंवा इतर जलस्रोतांमध्ये विसर्जन टाळल्यास जलप्रदूषण कमी होण्यास मोठी मदत होईल,' असे त्यांनी स्पष्ट केले.

नगरपरिषदेच्या या उपक्रमाचे शहरातील नागरिकांकडून स्वागत करण्यात येत असून, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारे हे विसर्जन शहरासाठी आदर्श ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने गणेश मंडळे तसेच घरगुती गणेशमुर्तींच्या भाविकांना विसर्जनाच्या वेळी शिस्त राखून सहकार्य करण्याचेही आवाहन केले आहे.



> 'श्रीगणेशाच्या विसर्जनावेळी श्रद्धेसोबत पर्यावरणाची जपवणुक करणे ही प्रत्येक नागरिकाची सामुहिक जबाबदारी आहे. नगरपरिषदेने शहरातील गणेशभक्तांच्या सोयीसाठी विविध ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था केली आहे. सर्व घरगुती गणेशमूर्तीधारकांनी नदी–नाल्यांमध्ये किंवा इतर ठिकाणी विसर्जन न करता कृत्रिम तलावातच श्रीगणेशाचे विसर्जन करुन पर्यावरण संरक्षणाच्या या उपक्रमात सहभागी व्हावे,' असे आवाहन नगरपरिषदेचे नगराध्यक्ष ईश्वर सलामे यांनी केले.





> 'गणेश विसर्जनाच्या दिवशी नागरिकांनी विसर्जनस्थळी शिस्त पाळावी, तलावात प्लास्टिक, निर्माल्य किंवा इतर कचरा टाकू नये. निर्माल्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असून त्याचाच वापर करावा. विसर्जनस्थळी स्वच्छता राखल्यास कर्मचाऱ्यांना व्यवस्था सुरळीत ठेवणे सोपे जाईल आणि शहर स्वच्छ राहण्यास मदत होईल,' असे आवाहन नगरपरिषदेचे स्वच्छता व पाणीपुरवठा अभियंता सुरेंद्र चोचमकर यांनी केले.



> 'गणेशोत्सव हा श्रद्धा आणि संस्कृतीचा उत्सव आहे. त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही आपण सर्वांनी पार पाडली पाहिजे. नगरपरिषदेने नगरपरिषद मैदान, केदारेश्वर मंदिर परिसर आणि लक्ष्मीनगर येथील महादेव मंदिर परिसरात कृत्रिम तलावांची व्यवस्था केली आहे. सर्व गणेशभक्तांनी नदी, नाले किंवा इतर जलस्रोतांमध्ये विसर्जन न करता या कृत्रिम तलावांमध्येच श्रीगणेशाचे विसर्जन करावे. विसर्जनावेळी स्वच्छता राखुन प्रशासनाला सहकार्य करावे, जेणेकरुन पर्यावरणपूरक आणि सुरक्षित गणेश विसर्जनाचा आदर्श निर्माण होईल,' असे आवाहन वरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गजानन भोयर यांनी केले आहे.

---

# 'सुपर एल निनो'मुळे साडेचार लाख लोकांना मृत्यूचा धोका

**जगभरात भारतासह आशियाई देशांना तीव्र उष्णतेचा बसणार फटका**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – आगामी 'सुपर एल निनो'च्या पहिल्या टप्प्यात जगभरात तीव्र उष्णतेमुळे तब्बल ४ लाख ५० हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. शिकागो विद्यापीठाच्या 'क्लायमेट इम्पॅक्ट लॅब'च्या संशोधकांनी बुधवारी जाहीर केलेल्या अहवालात हा धक्कादायक इशारा देण्यात आला आहे.

या अहवालानुसार, भीषण 'अल निनो'मुळे २०२७ च्या मध्यापर्यंत भूभागाचे तापमान सरासरीपेक्षा सुमारे १.२ अंश सेल्सिअसने वाढण्याची शक्यता आहे. संशोधकांच्या अंदाजानुसार, सप्टेंबर २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या काळात जगभरात २ लाख ३९ हजार लोकांचा उष्णतेमुळे मृत्यू होऊ शकतो. यातील बहुतांश मृत्यू हे 'ग्लोबल साउथ'मधील देशांमध्ये होतील, जेथे तापमान वेगाने वाढण्याची शक्यता आहे. तसेच १९९६ ते २०२५ या कालावधीच्या तुलनेत अत्यंत उष्ण दिवसांच्या संख्येत ४४ टक्क्यांनी वाढ होणार आहे.

सर्वाधिक जीवितहानी आफ्रिकेच्या साहेल भागात 'क्लायमेट इम्पॅक्ट लॅब'चे सहसंस्थापक मायकेल ग्रीनस्टोन यांनी सांगितले की, ' या उष्णतेचा पिकांवर होणारा परिणामांबाबत आपण आधीपासूनच स्पष्टपणे सांगू शकत होतो, मात्र आता मानवी मृत्यूंसारख्या गंभीर परिणामांचा अंदाज लावणेही शक्य झाले आहे.

---

# राज्यात ४७ नवीन अतिरिक्त तहसीलदार कार्यालये

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – सर्वसामान्य आणि ग्रामीण जनतेला शासकीय सुविधा सहज मिळाव्यात तसेच प्रशासकीय कामकाज गतिमान व्हावे, यासाठी २१ जिल्ह्यात ४७ नवीन अतिरिक्त तहसीलदार कार्यालये सुरू करण्यात येत आहेत. महसूलमंत्री बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे.




मुंबई उपनगर जिल्ह्यात कुर्ला, बोरिवली आणि अंधेरी तालुक्यातील अनुक्रमे चेंबूर, मालाड आणि वांद्रे येथे तर नाशिक जिल्ह्यात बागलाण तालुक्यातील नामपूर येथे नवीन अतिरिक्त तहसीलदार कार्यालय सुरु होईल. प्रशासकीय विकेंद्रीकरणाला गती देण्यासाठी चार प्रमुख जिल्ह्यांमध्ये चार नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालये स्थापन करण्यात आली. पुण्यातील बारामती, सोलापुरातील पंढरपूर, रत्नागिरीतील दापोली आणि नागपूरमधील नागपूर (ग्रामीण) येथे नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयांची निर्मिती करण्यात आली आहेत. कामकाजाचा वाढता व्याप, उपलब्ध अपुरा अधिकारी आणि कर्मचारीवृंद, तालुक्यांचे तसेच जिल्ह्यांचे अंतर, लोकसंख्या व नागरीकरण विचारात घेऊन प्रशासन लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला.

---

# दीपक वाघस्कर मृत्यूप्रकरणी पोलीस अधीक्षकांची मोठी प्रतिक्रिया : म्हणाले, 'लाठीचार्जवेळी ते घटनास्थळी नव्हते'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**अहिल्यानगर** – जिल्ह्यातील भिंगार येथे गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान झालेल्या वादानंतर दीपक वाघस्कर या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून भिंगार बेमुदत बंद ठेवण्यात आले आहे. या संपूर्ण घटनेवर अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी महत्त्वाची प्रतिक्रिया दिली असून, दीपक वाघस्कर यांचा [illegible] लाठीचार्जमुळे झालेला नसल्याचा दावा केला आहे.


दीपक वाघस्कर यांचा मृत्यू पोलिसांच्या लाठीचार्जमुळे झालेला नसल्याचा दावा पोलीस अधीक्षकांनी केला आहे. गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान झालेल्या सौम्य लाठीचार्ज केला त्यावेळी घटनास्थळी दीपक वाघास्कर नव्हते, असं सुदर्शन यांनी स्पष्ट केलं आहे. व्हिडिओमध्ये दिसणारी ट्रॅक्टरची ट्रॉली धोकादायक होती आणि त्यावर गणेशभक्त नाचत होते. ट्रॉली कोसळून मोठा अपघात होण्याची शक्यता असल्याने पोलिसांकडून गणेशभक्तांना ट्रॉलीच्या खाली उतरण्याची विनंती करण्यात येत होती. मात्र, डीजेच्या मोठ्या आवाजामुळे पोलिसांचं म्हणणं गणेश भक्तांना ऐकू येत नसल्याने पोलीस कर्मचाऱ्यांकडून काठीच्या सहाय्याने गणेश भक्तांना खाली उतरण्याची विनंती केली जात होती, असा दावा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केला आहे. दरम्यान, दीपक वाघस्कर यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, हे शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. सर्व गणेश भक्तांनी शांतता पाळावी , जर कोणी दोष असेल तर कारवाई केली जाईल, असं देखील पो–लीस अधीक्षक सुदर्शन यांनी म्हटलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भिंगार येथील समर्थ युवा मंडळ आणि शुकलेश्वर गणेश मंडळ यांची विसर्जन मिरवणूक एकत्र निघाली होती. या दरम्यान डीजे वाजवण्यावरून दोन मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये क्षुल्लक कारणावरून वाद झाला.

---

# एमपीएससी आंदोलनाला पुणे पोलिसांनी परवानगी नाकारली

**रोहित पवार २७ सप्टेंबरच्या आंदोलनावर ठाम**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली २७ सप्टेंबर रोजीच्या आंदोलनाला पुणे पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता कायम ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले.

पवार यांनी विद्यार्थ्यांसह एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलनाची घोषणा केली होती. सुरुवातीला २६ सप्टेंबर रोजी आंदोलन करण्याचे नियोजन होते. मात्र, गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांवरील बंदोबस्ताचा ताण लक्षात घेऊन आंदोलनाची तारीख २७ सप्टेंबर करण्यात आली.

